Bachelor of Science (B.Sc.) / B.Sc. (Information Technology) /
Bachelor of Computer Application (SCI) (CBCS Pattern) Second Semester

# UCA2F021 / UBITT202.2 / UBCAT202.2 - Compulsory Marathi - आवश्यक मराठी

P. Pages : 2 **GUG/W/18/10919**

Time : Three Hours Max. Marks : 80

* 3 0 5 1 *

---

**1.** 'शिक्षक हाच राष्ट्राचा भाग्यविधाता' असे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज का म्हणतात? **15**

**किंवा**

'पाणी अडवा-पाणी जिरवा' या पाठात लेखकाने आपले स्वानुभव कसे कथन केले आहेत, ते सांगा.

**2.** 'खरा धर्म' या कवितेतून साने गुरुजी यांनी कोणते विचार व्यक्त केले आहेत? **15**

**किंवा**

'प्रेमाचा गुलकंद' या केशवकुमारांच्या कवितेचे रसग्रहण करा.

**3.** पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर शब्दांत लिहा. **15**

**गट - 'अ'**

क) वि. दा. सावरकरांनी कोणत्या सात स्वदेशी बेड्या तोडण्याचे आवाहन केले आहे?

ख) संकुचित प्रांतीयतेचे कोणते धोके पु. ल. देशपांडे यांनी सांगितले आहेत?

ग) 'भरती' या कथेच्या आधारे लच्छू ठाकरेच्या जीवनात कसे बदल झाले ते सांगा?

**किंवा**

**गट - 'ब'**

च) आपल्या देशातील विविधता पु. ल. देशपांडे यांनी कशी सांगितली आहे?

छ) कथाकार वसंत व्हाडपांडे यांच्या बोलण्याचा लच्छूवर कोणता परिणाम झाला?

ज) रोटीबंदीची बेडी तत्काळ तोडली तर बाकीच्या सर्व बेड्या एकदमच तुटल्या जातात, असे सावरकर का म्हणतात?

**4.** पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर शब्दांत लिहा. **15**

**गट - 'क'**

त) संतांचे सामाजिक दायित्व तुकारामांच्या अभंगाद्वारे स्पष्ट करा?

थ) स्त्रीच्या कौमार्यवस्थेतील 'स्वत्व' जोपासण्याकरीता शांता शेळके स्त्रीला कोणता सावधतेचा इशारा देतात?

munotes.in

द) 'जहर खाऊ नका' या कवितेतून कविने बळीराजाला कोणता संदेश दिला आहे?

**किंवा**

**गट - 'ड'**

प) ''मृगाचिया अंगी कस्तुरीचा वास'' या ओळीचा भावार्थ स्पष्ट करा?

फ) 'अशा पावसापाण्याची नको बाहेर जाऊस!' असे शांता शेळके स्त्रीला उद्देशून का म्हणतात?

ब) ''तुमच्या साथीला आम्ही आहो ना बाबा, जहर खाऊ नका!' असे सांगून शेतकऱ्याची मुलगी त्याचे मनोधैर्य कशाप्रकारे वाढविते?

**5.** अ) पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे लिहा. **10**

**गट - 'एक'**

1) पत्रव्यवहार हा दोन व्यक्ती किंवा संस्थाना जोडणारा दुवा कशाप्रकारे असतो?

2) निमंत्रण पत्रिकेच्या लेखनाचे स्वरूप सामान्यतः कसे असावे?

**किंवा**

**गट - 'दोन'**

3) कार्यालयीन पत्रव्यवहाराचे स्वरूप स्पष्ट करा.

4) नोकरीसाठी करावयाच्या अर्जाची रचना कोणकोणत्या मुद्यांनुसार असावी?

ब) पुढीलपैकी **कोणत्याही पाच** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. **10**

1) संधी म्हणजे काय?

2) संधीचे एकूण प्रकार किती व कोणते आहेत?

3) व्यंजनसंधी म्हणजे काय?

4) स्वरसंधी म्हणजे काय ते सोदाहरण स्पष्ट करा.

5) पूर्वरूपसंधी म्हणजे काय?

6) पररूप संधी म्हणजे काय?

7) 'यणादेश' म्हणजे काय ते स्पष्ट करा.

***************

munotes.in